


प्रभू श्रीराम आणि रामराज्याचे ध्येय... पान २

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २२२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२५ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## इराणचा भारताला सर्वात मोठा धोका; पाकिस्तानचं ऐकून संतापजनक कृत्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, दिल्ली :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू आहे. युद्ध सुरू होऊन ३ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. मात्र हे युद्ध अजूनही थांबलेलं नाहीये. या युद्धात अमेरिका आणि इस्त्रायलकडून झालेल्या हल्ल्यांमध्ये इराणचं प्रचंड नुकसान झालं आहे. या युद्धादरम्यान इराणच्या मदतीसाठी भारत पुढे आला आहे. संपूर्ण भारतामधून इराणला मानवतावादी मदतीचा ओघ सुरू आहे. जम्मू काश्मीरमधून तर आतापर्यंत इराणला मोठ्या प्रमणात मदत पाठवण्यात आली आहे. काही जणांनी तर आपले सोन्या-चांदीचे दागिने देखील इराणला मदत म्हणून दिले आहेत. याबद्दल इराणने यापूर्वी एकदा भारताचे आभार मानले होते. मात्र आता इराणचा दुटप्पीपणा पुन्हा एकदा जगासमोर आला आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलकडून सुरू असलेल्या हल्ल्यांमध्ये इराणचं प्रचंड नुकसान झालं आहे. त्यामुळे



भारतीय लोक इराणप्रति आपली सहानुभूती व्यक्त करत आहेत. भारतामधून इराणला मदतीचा ओघ सुरू आहे.

विशेष: काश्मीरमधून तर प्रचंड प्रमाणात इराणला मदत करण्यात आली आहे. पण काश्मीरच्या मुद्द्यावर इराणने दुटप्पीपणा दाखवला आहे. काश्मीरमधून इराणला मोठी मदत मिळाल्यानंतर इराणने आपल्या अधिकृत सोशल अकांउटवर काश्मीर जनतेचे आणि भारताचे आभार मानले होते. परंतु त्यानंतर काही पाकिस्तानी लोकांकडून या संदर्भात इराणकडे तक्रार करण्यात आली.

काश्मीर हा भारताचा हिस्सा नसल्याचं आपल्या तक्रारीमध्ये पाकिस्तानने म्हटलं, त्यानंतर भारतामधील इराणच्या दुतावासाकडून आपली ही आभार प्रदर्शन करणारी पोस्ट चक्क डिलिट करण्यात आली आहे. इराणच्या या दुटप्पीपणावर आता भारतामधून संताप व्यक्त होत आहे.

काश्मीरच्या लोकांनी इराणला मोठ्या प्रमाणात मदत केली, कोणी पैसे दिले, कोणी सोनं दिलं, कोणी चांदी दिली. एवढंच नाही तर इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्ला अली खामेनेई यांच्या मृत्यूनंतर त्यांना श्रद्धांजली देणारे काही मोठ मोठे पोस्टर देखील काश्मीरमध्ये लावण्यात आले आहेत. मात्र तरी देखील पाकिस्तानच्या दबावामुळे आता इराण काश्मीरला भारताचा भाग माण्यास भीत असल्याचं समोर आलं आहे.

**ती पोस्ट डिलिट केली...**

इराणने युद्धकाळातील मदतीबद्दल एक पोस्ट करून भारतीय लोकांचे आभार मानले होते. काश्मीरमधील एका बहिणीने तिच्या पतीच्या आठवणीत जपून ठेवलेले दागिने मानवतावादी मदत म्हणून इराणला दिले, भारतीय लोकांचं प्रेम आणि इराणप्रति असलेल्या त्यांच्या सद्भावना हा आमच्या ऊर्जेचा सर्वात मोठा स्त्रोत आहे, धन्यवाद काश्मीर, धन्यवाद भारत असं इराणने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं होतं. मात्र त्यानंतर इराणकडून ही पोस्ट डिलिट करण्यात आली आहे.

## सावधान! पीडित महिलेची, ओळख उघड कराल तर होईल जेल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, नाशिक :** अशोक खरात या भोंदू बाबाविरोधात सध्या नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (SIT) आता एक अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले असून, पीडित महिलेची ओळख कोणत्याही स्वरूपात उघड न करण्याचे आदेश दिले आहेत.

**ओळख उघड करणे हा दखलपात्र गुन्हा**

तपास पथकाच्या निदर्शनास आले आहे की, काही न्यूज चॅनेल्स, युट्यूब पोर्टल्स आणि सोशल मीडिया हँडल्सवर पीडितेचा चेहरा 'ब्लर' करून बातम्या दाखवल्या जात आहेत. मात्र, तिचा पेहराव, उंची आणि हावभावामुळे परिचित व्यक्तींना तिची ओळख पटण्याची शक्यता आहे.

**कायद्याचा बडगा :**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम ७२(१) नुसार, पीडितेची ओळख उघड करणे हा एक गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे.

अशा वृत्तांकनामुळे पीडितेच्या कुटुंबीयांना प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

ओळख उघड होण्याच्या भीतीमुळे इतर संभाव्य पीडित महिला तक्रार करण्यासाठी पुढे येण्यास कचरत आहेत.

**सामाजिक संस्थांनाही तंबी !**

केवळ मीडियाच नव्हे, तर काही सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते पीडितेच्या घरी जाऊन किंवा सार्वजनिक वक्तव्ये करून अप्रत्यक्षपणे तिची ओळख उघड करत असल्याचे समोर आले आहे. अशा कार्यकर्त्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याचे तपास पथकाने स्पष्ट केले आहे.

● कोणीही नागरिक किंवा संपादकांनी पीडितेच्या गोपनीयतेचा भंग करू नये. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध तत्काळ गुन्हे नोंदवून कठोर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

**– प्रमुख, विशेष तपास पथक** (SIT)

## कळंबोलीत अतिक्रमण विभागाकडून अनधिकृत व्यवसायांवर कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, पनवेल :** कळंबोली प्रभाग समिती ब मधील सेंट जोसेफ शाळेजवळ दिनांक २३ मार्च रोजी अनधिकृत पणे फूटपाथ वर आणि वाहनांमधून फळ व भाजी विकणाऱ्या वाहनांवर कारवाई करून ०२ टेम्पो वाहने व ०२ हातगाड्या जप्त करण्यात आल्या. प्रभाग समिती ब च्या अतिक्रमण विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे सेंट जोसेफ शाळेजवळ येथे होणारी ट्राफिकची समस्या कमी होण्यास मदत होत आहे. गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या वतीने पालिका हद्दीतील चारही प्रभागातील अनधिकृत झोपड्या, शेड, फळ-भाजी स्टॉल्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी तोडक कारवाई करण्यात येत आहेत.

कळंबोली मधील फूटपाथवरील अनधिकृत फळे, भाजी विक्रेते तसेच इतर व्यवसाय स्टॉल्स वरही सातत्याने कारवाई करून फूटपाथ स्वच्छ करण्यात येत आहेत. याचप्रमाणे




प्रभागातील अनधिकृत बॅनर्स वरतीही तोडकर कारवाई करण्यात येत आहे. कळंबोली प्रभाग अधिकारी सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी प्रभारी अधिक्षक राजेश डोंगरे, अतिक्रमण पथकातील सुपरवायझर, कर्मचारी उपस्थित होते.

## केशवनगर, मुंढवा येथे गोळीबाराची धक्कादायक घटना

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२४, पुणे :** शहरातील मुंढवा परिसरात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून निष्काळजीपणातून झालेल्या गोळीबारात १७ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना १८ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास केशवनगर येथील गुरुकृपा सोसायटीच्या पाठीमागील मोकळ्या जागेत घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सक्षम युवराज गायकवाड, ओम दुर्गा गायकवाड, सोनु उर्फ सोन्या मुंडे उर्फ सुमित सुजित बर्णवाल आणि यश सुशिल गायकवाड(सर्व जण रा. सर्वोदय कॉलनी मांजरी पुणे )हे सर्वजण एकत्र आले होते. त्यावेळी त्यांच्या ताब्यात असलेले पिस्टल एकमेकांच्या हातात देत, गोळीबाराची ॲक्शन करत खेळत होते. या निष्काळजी कृत्यादरम्यान अचानक गोळी सुटली आणि ती तेथे उपस्थित असलेल्या १७ वर्षीय मुलाच्या पोटावर लागली. गोळी लागल्यानंतर मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच मुंढवा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि सर्व आरोपींना अटक केली. या प्रकरणात शस्त्र बाळगणे व त्याचा निष्काळजी वापर याबाबत सखोल तपास सुरू आहे. तसेच फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने घटनास्थळाची तपासणी करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला असून, अशा प्रकारच्या निष्काळजीपणावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बेकायदेशीर शस्त्रांच्या वापराबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मुंढवा पोलिसांकडून पुढील तपास वेगाने सुरू आहे.

## राज्यात लवकरच येणार १७३७ नवीन रुग्णवाहिका

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, मुंबई :** नागरिकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा १०८ (टोल फ्री क्रमांक) रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून दिल्या जात आहेत. मात्र याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने यामध्ये त्रुटी दूर करून वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर राज्यात लवकरच १७३७ नवीन १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असे विधानसभेत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

राज्यात सुरू असलेल्या १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिका सेवेबाबत सदस्य गोपिचंद पडळकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला मंत्री प्रकाश आबिटकर यांनी उत्तर दिले.

मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, १०८ रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून नागरिकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा दिल्या जात आहेत. ही संपूर्ण सेवा करार आणि सामंजस्य करार पद्धतीने एजन्सीद्वारे चालवली जाते. संबंधित एजन्सींनी किमान वेतन कायद्याचे पालन करून त्यांच्या कर्मचाऱ्यांना योग्य वेतन देणे बंधनकारक आहे. या जबाबदारीत कुठलीही त्रुटी आढळल्यास शासनाकडून कारवाई केली जाईल, या संदर्भात आलेल्या तक्रारींची दखल घेत राज्य शासनाने १०८ रुग्णवाहिका सेवेसाठी चौकशी समिती नेमली आहे. या समितीद्वारे सेवेमधील त्रुटी दूर करून कामकाज अधिक गतिमान करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चौकशी अहवाल अंतिम टप्प्यात असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सदस्य शरद सोनावणे, राजेश पवार, भास्कर जाधव यांनी उपप्रश्न उपस्थित करुन चर्चेत सहभाग घेतला.

## एसटीच्या ताफ्यात अत्याधुनिक राजमात जिजाऊ बस दाखल !

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊया बस सेवेचा लोकार्पण सोहळा ढोल ताशांच्या गजरात आणि लेझिमच्या लयबद्ध तालावर पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली. विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या बस सेवा लोकार्पणाच्या दिमाखदार सोहळ्याला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक,वरिष्ठ अधिकारी तथा उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान ही बस सेवा 'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे




लोकार्पण तथा विधिवत पूजन, फीत कापून झाल्या नंतर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार आणि परिवहन मंत्री सरनाईक यांनी या बसमधून प्रवास करत नव्या युगाची सुरुवात प्रत्यक्ष अनुभवली,तर यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

'राजमाता जिजाऊ या नावाबद्दल बोलताना परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, हिंदू स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या नावाने या बसला नाव देणे, हे महाराष्ट्राच्या स्त्रीशक्ती आणि सांस्कृतिक वारशाचा सन्मान आहे. यापूर्वी राज्य परिवहन महामंडळाने शिवनेरी, शिवशाही आणि हिरकनी यांसारख्या बसेस चालवल्या आहेत.

राजमाता जिजाऊ' बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित होईल., अशी अपेक्षा मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

हा उपक्रम महाराष्ट्राची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आधुनिक, सुरक्षित आणि प्रवासी-स्नेही बनवण्याच्या दिशेने एक मैलाचा दगड ठरेल.

## थोडक्यात

### चिमूरच्या नारीशक्तीचा मोठा सन्मान, हिराई महोत्सवात १ कोटींचा धनादेश प्रदान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, चिमूर :** चंद्रपूर येथील चांदा क्लब ग्राऊंडवर आयोजित 'जिल्हास्तरीय कृषी, पशु-पक्षी प्रदर्शन व मिनी सरस हिराई महोत्सव - २०२६' मध्ये चिमूर तालुक्यातील 'नारीशक्ती महिला प्रभागसंघ, मासळ' यांना तब्बल १ कोटी (१,००,००,०००) रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

२० मार्च २०२६ रोजी झालेल्या या शानदार उद्घाटन सोहळ्यात चंद्रपूरचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके आणि खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या शुभहस्ते हा धनादेश देण्यात आला.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी व पशुसंवर्धन विभाग, जि.प. चंद्रपूर, उमेद अभियान आणि माविम यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

येथे शेतकरी, महिला बचत गट, उद्योजक आणि पशुपालकांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादनांचे प्रदर्शन मांडले आहे.

हा महोत्सव शेतकऱ्यांसाठी ज्ञान, नवीन तंत्रज्ञान आणि हक्काची बाजारपेठ मिळवून देणारे एक सक्षम व्यासपीठ ठरत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करून विकासाला चालना देणारा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महिला सक्षमीकरणाचे आणि ग्रामीण विकासाचे हे पाऊल संपूर्ण चिमूर तालुक्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. सदर धनादेश स्वीकारताना चिमूर तालुका अभियान व्यवस्थापक अर्चना बोनसुले, प्रभाग समन्वयक हेमचंद बोरकर, सविता उईके, लिना राऊत, महिला उपस्थित होत्या.

### लोणजाई गडाच्या पायथ्याशी भक्तीचा जागर नाना महाराज पुण्यस्मरण सोहळा उत्साहात संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक)** : लोणजाई गड परिसर, नाना महाराज समाधी मंदिरात कीर्तन, टाळ-मृदंगाच्या गजरातील दिंडी सोहळा आणि भाविकांची गर्दी.

निफाड तालुक्यातील सुभाष नगर येथील लोणजाई माता गडाच्या पायथ्याशी असलेल्या वैकुंठवासी ह.भ.प. नाना महाराज समाधी मंदिर आश्रमात १६ व्या पुण्यस्मरण सोहळ्याची मोठ्या उत्साहात सांगता झाली. गेल्या आठ दिवसीय असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने आणि भव्य दिंडी सोहळ्याने करण्यात आली.

प.पू. गोविंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्यात विंचूर, सुभाष नगर, सोनेवाडी, उगाव आणि निफाड परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावली होती. सप्ताहाच्या काळात पहाटेची काकड आरती, संत निवृत्तीनाथ महाराज गाथा पारायण आणि रात्री नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे भव्य दिंडी. वारकरी संप्रदायातील महिला आणि पुरुषांनी मोठ्या संख्येने यात सहभाग घेतला. पारंपरिक भारुडांच्या कार्यक्रमाने भाविकांची मने जिंकली. परिसरातील भजनी मंडळ आणि मृदंगाचार्यांनी आपल्या कलेतून सप्ताहाची रंगत वाढवली.

**समितीचे आवाहन :** नाना महाराज आश्रम समितीच्या वतीने यावेळी माहिती देण्यात आली की, आश्रमात सध्या भव्य मंदिर आणि यज्ञभूमीचे काम प्रगतीपथावर आहे. या पवित्र कार्यासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन समितीने केले आहे.

या कार्यक्रमासाठी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सुभाष नगर आणि सोनेवाडी ग्रामस्थांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने या सोहळ्याचे नियोजन केले होते.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला डिजिटल शै.साहित्य भेट



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२४, दापोली (रत्नागिरी)** : मंडणगड तालुक्यातील, मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला डिजिटल शै.साहित्य, विधान परिषद आमदार निरंजनजी डावखरे यांच्या स्थानिक विकास निधीतून संस्थेचे अध्यक्ष मा.भाईसाहेब जगताप व संस्था पदाधिकारी यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यालयाला डिजिटल साहित्य मिळाले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शाळेला दोन संगणक संच, एक प्रिंटर, एक स्मार्ट बोर्ड या आत्याधुनिक डिजिटल साधनांचा लाभ मिळाल्याने अध्यापन अधिक प्रभावी व गुणवत्ता पूर्ण होणार आहे.

या कार्यक्रमाच्या वेळी संस्था चिटणीस संतोषजी मांढरे, विद्यालयाचे सहा.शिक्षक बजरंग गावडे, शिक्षकेतर कर्मचारी दीपक पवार उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डिजिटल शिक्षण ही काळाची गरज असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शिक्षणाची समान संधी मिळावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे असे सांगितले.

या उपक्रमाबद्दल संस्था पदाधिकारी शाळेचे मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शाळा प्रशासन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने आमदार निरंजनजी डावखरे यांचे आभार मानून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

## शेती महामंडळाच्या ४ हजार एकर जमीन व्यवहाराची चौकशी करा

### जमिनी संदर्भात खा.लंके यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन; संशयास्पद कंपन्यांना जमीन देण्याच्या प्रस्तावावर कारवाईची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** श्रीरामपूर तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व शेती महामंडळाकडे असलेली सुमारे ४ हजार एकर बागायती जमीन झेड आर टू ग्रुप होल्डिंग कंपनी व झेड आर टू बायो एनर्जी कंपनी लिमिटेड या खाजगी कंपन्यांना देण्याच्या प्रस्तावावर खासदार नीलेश लंके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात खा. लंके यांनी नमूद केले आहे की, संबंधित कंपन्यांची रचना, आर्थिक व्यवहार व संचालक मंडळातील परस्पर संबंध अत्यंत संशयास्पद असून या कंपन्यांची 'शेल' स्वरूपाची शक्यता नाकारता येत नाही. झेड आर टू ग्रुप होल्डिंग कंपनी व झेड आर टू बायो एनर्जी कंपनी लिमिटेड यांच्यात ६१ टक्के भागभांडवलाद्वारे थेट नियंत्रण संबंध असून दोन्ही कंपन्यांमध्ये समान संचालक कार्यरत आहेत.



तसेच या कंपन्यांचे इतर संबंधित संस्थांशीही हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

कंपनीच्या आर्थिक व्यवहारांमध्ये ही विसंगती आढळून येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अत्यल्प किंवा शून्य उलाढाल असताना कोट्यवधी रुपयांचा नफा दाखविणे, तसेच अचानक मोठ्या प्रमाणात भांडवली वाढ दर्शविणे व त्याबाबत स्पष्ट माहिती न देणे या बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याचे खा. लंके यांनी म्हटले आहे.

याशिवाय, विमान इंधन निर्मितीसारख्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली तांत्रिक व व्यावसायिक पात्रता संबंधित कंपन्यांकडे नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांशी कोणतेही करार नसताना एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी जमीन मागणी करण्यात येत असल्यामुळे प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार निलेश लंके यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केलेल्या मागण्यांमध्ये संबंधित कंपन्यांची आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर पात्रता स्वतंत्र उच्चस्तरीय समितीमार्फत तपासावी, संपूर्ण प्रकल्पाची सखोल चौकशी करण्यात यावी, जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव तात्काळ स्थगित किंवा रद्द करण्यात यावा आदी मागण्यांचा समावेश आहे.

## आरोग्य, वीज, शेती व पर्यटन प्रश्नांवर आमदार दाते यांचा आवाज



अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे मतदारसंघातील नांदगाव, शिंगवे, ढवळपुरी, ढोकी, धोत्रे, निघोज, भाळवणी, वडगाव आमली आदी गावांमध्ये कांदा, कलिंगड, डाळिंब, टोमॅटो, आंबा व गहू पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून मदत देण्याची त्यांनी शासनाकडे केली.

औद्योगिक विकासाच्या संदर्भात बोलताना आमदार दाते यांनी राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत असल्याचे नमूद केले. मात्र एमआयडीसी साठी शेतकऱ्यांकडून महागड्या दराने जमीन खरेदी करण्याऐवजी उपलब्ध सरकारी माळरान जमिनीचा उपयोग करण्याचा विचार शासनाने करावा.

पर्यटन विकासाच्या दृष्टीने निघोज येथील रांजण खळगे, दर्याबाई, वेल्हाबाई परिसर तसेच सिद्धेश्वर मंदिर यांसारख्या निसर्गरम्य स्थळांचा विकास केल्यास स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे सांगत मतदारसंघातील पर्यटनाला चालना देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. लोकहिताच्या विविध प्रश्नांवर अभ्यासपूर्ण व ठाम मांडणी करत आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत मतदारसंघाचा आवाज बुलंद केल्याने त्यांच्या कार्यशैलीचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर)** : महाराष्ट्र विधानमंडळाच्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावर चर्चा करताना पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विविध लोकहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे मांडणी करत शासनाचे लक्ष वेधले.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, राज्यात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्या तरी डॉक्टर व नर्सेसच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त जागांमुळे नागरिकांना अपेक्षित सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

राज्यात अजूनही सुमारे ३९८ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २८०६ उपकेंद्रांची आवश्यकता असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच २००६ पासून लागू असलेल्या एमबीबीएस बंधपत्र धोरणात बदल करून इच्छुक डॉक्टरांना कायमस्वरूपी सेवा देण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

ऊर्जा विषयावर बोलताना आमदार दाते यांनी राज्याच्या स्वयंपूर्ण ऊर्जाधोरणाचे स्वागत केले; मात्र सौरऊर्जा प्रकल्प अपूर्ण असल्याने ग्रामीण भागात संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याची गंभीर समस्या मांडली. यामुळे शेतकरी, विद्यार्थी व गृहिणींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगत महावितरणला तातडीने योग्य सूचना देण्याची मागणी केली.

## रायगड जिल्ह्यात ढगाळ वातावरणाचा फटका

### आंबा, भाजीपाला हंगामावर संकटाची छाया; ढगाळ वातावरणामुळे उत्पादन धोक्यात

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२४, पेण (रायगड) :** गेल्या ३ ते ४ दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाची सुरुवात झाली असून रायगड जिल्ह्यात अचानक निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे फळपिकांसह भाजीपाला पिकांवर ही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आठवडाभरापासून कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले होते. मात्र अचानक वातावरणात झालेल्या बदलामुळे शेतकरी व बागायतदार चिंतेत सापडले आहेत.

विशेषतः आंबा बागायतदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या आंबा पिकाचा महत्त्वाचा टप्पा सुरू असताना ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस आणि वाढलेली आर्द्रता यामुळे फळगळ तसेच बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उत्पादनात घट येण्याची



भीती व्यक्त होत आहे.

याचबरोबर भाजीपाला पिकांनाही या हवामानाचा मोठा फटका बसू शकतो. काकडी, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी यांसारख्या पिकांमध्ये रोगराई वाढण्याची शक्यता असून पानांवर डाग, कुज आणि उत्पादन घट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अचानक वाढलेली आर्द्रता आणि ढगाळ वातावरण यामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता अधिक आहे.

उन्हाळ्यात येणाऱ्या काजू, जांभूळ आणि करवंद या फळपिकांवरही या बदलत्या हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. उत्पादन कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा सल्ला दिला आहे. पिकांची नियमित पाहणी करणे, योग्य वेळी औषध फवारणी करणे, पाण्याचा निचरा व्यवस्थित ठेवणे आणि हवामानातील बदलांवर लक्ष ठेवणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले आहे. एकूणच अचानक बदललेल्या हवामानामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकरी आणि बागायतदारांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून येत्या काही दिवसांत हवामान कसे राहते यावरच पिकांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

सध्याच्या ढगाळ वातावरणामध्ये आंबा पिकावर करपा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे त्यासाठी कार्बेन्डाझिम २% + मॅन्कोझेब ६३% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी. उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे १५ दिवसाच्या अंतराने पीक काढणीला ०१ महिना कमी असेपर्यंत पाणी देण्याची व्यवस्था करावी. फळमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रक्षक सापळे प्रति एकर दोन प्रमाणे लावावे ढगाळ वातावरणामध्ये भाजीपाला पिकावर रस शोषणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे आंतरप्रवाही कीटकनाशकाची फवारणी करावी.

**- सागर वाडकर (तालुका कृषी अधिकारी)**

## महाराष्ट्र झोन-०१ अध्यक्षपदी अभिजीत दरेकरांची नियुक्ती जाहीर



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२४, ठाणे :** टेनिस क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत महाराष्ट्र झोन-०१ (मुंबई-ठाणे-कोकण) अध्यक्षपदी अभिजीत दरेकर यांची नियुक्ती अधिकृतरित्या जाहीर करण्यात आली आहे.फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्ती पत्र देण्यात आले. या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील टेनिस क्रिकेट क्षेत्राला नवे नेतृत्व लाभले असून खेळाच्या विकासाला चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अभिजीत दरेकर हे क्रीडा क्षेत्रातील सक्रिय आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वीही विविध क्रीडा उपक्रमांतून संघटन कौशल्य दाखवले असून स्थानिक पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम सातत्याने केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे मुंबई, ठाणे आणि कोकण परिसरातील टेनिस क्रिकेट स्पर्धांचे नियोजन अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नव्या जबाबदारीबाबत बोलताना अभिजीत दरेकर यांनी सांगितले की, टेनिस क्रिकेट हा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेला खेळ असून ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना समान संधी उपलब्ध करून देणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट असेल. अधिकाधिक स्पर्धा आयोजित करून नवोदित खेळाडूंना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला जाईल. या नियुक्तीचे विविध क्रीडा क्षेत्रातून स्वागत होत असून अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र झोन-०१ अंतर्गत टेनिस क्रिकेटच्या प्रसार आणि विकासासाठी दरेकर यांच्या नेतृत्वाखाली नवे उपक्रम राबवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सुजित झावरे यांचा वाढदिवस शुभेच्छांचा बॅनर अज्ञातांनी फाडले

## सलग दुसर्‍यांदा फलक फाडल्याने पारनेरमध्ये तणाव



**“कितीही विरोध झाला तरी विकासकामे थांबणार नाहीत”**

निंदकाचे घर असावे शेजारी. तुम्ही माझे शुभेच्छा फलक फाडले असतील, पण माझे काम आणि जनतेची साथ तुम्ही कधीही फाडू शकणार नाही. मी काम करणारा माणूस आहे. कितीही विरोध झाला तरी शहराची विकासकामे थांबणार नाहीत.

- सुजित झावरे पाटील (शिवसेना नेते)

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहरामध्ये माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेल्या शुभेच्छा फलकांची अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे झावरे पाटील यांच्या समर्थकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी झावरे पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने त्यांच्या समर्थकांनी शहरातील बस स्थानक, खालची वेस, तहसील कार्यालय परिसर तसेच कान्हूरपठार चौक अशा महत्त्वाच्या ठिकाणी शुभेच्छांचे मोठे बॅनर लावले होते. मात्र, हे फलक लावल्यानंतर काही तासांतच रात्रीच्या अंधारात अज्ञातांनी ते फाडून टाकले. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर शहरात चर्चेला उधाण आले असून, या कृत्यामागे नेमके कोण आहे याचा शोध घेण्याची मागणी होत आहे.

झावरे पाटील यांनी अलीकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पारनेर शहरात विकासकामांच्या मागण्यांनी जोर धरला आहे. शहराचा डीपीआर मंजूर करून आणणे आणि रखडलेली पाणी योजना मार्गी लावण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

याच पार्श्वभूमीवर लावण्यात आलेल्या बॅनरवर ‘पारनेर शहराच्या विकासाचे शिल्पकार’ आणि ‘बोले तैसा चाले’ असा उल्लेख करण्यात आला होता. यापूर्वीही डीपीआर मंजुरीचे फलक फाडल्याची घटना घडली होती, त्यामुळे हा प्रकार जाणीवपूर्वक केला जात असल्याचा संशय समर्थकांनी व्यक्त केला आहे.

# संसार साहित्यासाठी सोयगाव च्या कामगारांकडून एक ते दीड हजाराची उकळणी

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२३, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी शासन देत असलेल्या विविध लाभामध्ये संसार साहित्य वाटपाकरिता सोयगाव तालुक्यासाठी अधिकृत केंद्र नसल्यानेभांडे मिळवून देण्यासाठी कामगारांचीएका खाजगी एजंट कडून लूट केली जात आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना आणलेल्या आहेत. यात नोंदणी केल्यानंतर सर्वात प्रथम कामगार पेटी सेप्टी किट दिली जाते यात कामावर लागणाऱ्या विविध वस्तू असतात त्यानंतर संसार साहित्य दिले जाते यात संसार उपयोगी ३० भांडे दिले जातात.

सोयगाव ला हे साहित्य वाटप चे अधिकृत केंद्र नसल्यामुळे इतर केंद्र निवडावे लागतात. याचाच गैरफायदा घेऊन काहींनी कामगारांची आर्थिक लूट सुरु केली आहे. ऑनलाईन पावतीवर कुणालाही पैसे देण्याची गरज नाही अशी सूचना केली असतांना एक हजार ते दीड हजार रुपये उकळले जात आहे. आपण पैसे दिले नाही तर आपल्याला भांडे मिळणार नाही. या भीतीने सर्व कामगार पैसे देत आहे.




**केंद्र मॅनेज करून भांडे देतो**

सोयगाव येथे विघ्नहर्ता मल्टीसर्व्हिसेस ऑनलाईन केंद्रात शेकडो कामगारांना केवायसी करून भांडे वाटप करण्यात येत आहे. याविषयी अमोल क्षीरसागर या केंद्र चालकाला विचारणा केली असता मी अधिकृत असलेले एक केंद्र मॅनेज केले, असून लोकांना सिल्लोड किंवा इतर ठिकाणी जाण्याची गरज नाही सोयगाव मध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली असल्याचे त्यांनी सांगितले. अधिकृत केंद्र मॅनेज कसं होऊ शकतं केंद्र चालक कामगारांचे साहित्य इतर व्यक्तीकडे कसे काय दिले जातात. अशा अनेक शंका उपस्थित होत आहे.

**सोयगावला केंद्र नसल्याने होत आहे लूट..**

कामगारांना दिले जाणारे साहित्य वाटप करण्याचे अधिकृत केंद्र नसल्याने सोयगाव तालुक्यातील कामगारांना सिल्लोड, नाचणवेल, वैजापूर आदी ठिकाणी साहित्य घ्यायला जावे लागत आहे. याचाच गैरफायदा घेऊन सोयगाव तालुक्यातील कामगारांची लूट सुरु आहे. याविषयी सामाजिक कार्यकर्ते शंकर जेठे यांनी कामगारांची होणाऱ्या लूट विषयी एक व्हिडीओ काढून सोशल मीडिया वर पसरवून लोकांची लूट थांबविण्याची मागणी केली आहे. तशी तक्रार तहसीलदार यांच्या कडे केली आहे.

# खापरखेडा वीज केंद्राच्या परिसरातील नारोबा-बारोबा देवस्थानात महापूजा संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा येथील औष्णिक वीज केंद्रातून मोठ्या प्रमाणात नियमीत वीज निर्मिती व्हावी, केंद्रात कोणतीही दुर्घटना किंवा अप्रिय घटना घडू नये, सर्व कामगारांना सुख-शांती व निरोगी आरोग्य लाभो तसेच वीज केंद्र परिसरात शांतता व सुव्यवस्थेसाठी औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील नारोबा-बारोबा देवस्थानात महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) खापरखेडा, सुरक्षा रक्षक व सर्व कंत्राटी कामगारांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही २३ मार्च २०२६ रोजी धार्मिक कार्यक्रमांतर्गत महापूजन व भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांचे हस्ते विधिवत पूजा-अर्चना करण्यात आली. कार्यक्रमाला वीज केंद्रातील अधिकारी, अभियंता, कर्मचारी व कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष निलेश खरात, संघटनेच्या महानिर्मितीचे अध्यक्ष मोहन देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता नारायण राठोड, उपमुख्य अभियंता सचिन डेगवेकर, अधीक्षक अभियंता कमलेश मुनेश्वर, कार्यकारी अभियंता संदीप देवगडे, प्रदीप आखरे, आनंद सातभद्रे, नितीन मोहोड, पाटील, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे साहेब, वैद्यकिय अधिक्षक डॉ.मुकेश गजभिये, कोराडी (प्रकल्प) कामगार कल्याण अधिकारी अमरजीत गोडबोले, सुरक्षा विभाग कोराडीचे वरीष्ठ अधिकारी देवेंद्र राठोड, खापरखेडा वीज केंद्राचे वरिष्ठ सुररक्षा अधिकारी नवीनकुमार सतीवाले, उपवरीष्ठ सुरक्षा अधिकारी रोहन धोटे, सचिन पवार, कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड, सचीव दिवाकर घेर, शांताराम गावंडे, भीम सिरिया, शेखर आदमने, अमरचंद जैन, रमेश लोणारे, चंद्रशेखर पानतावणे, कृष्णा नमलेवार,अशोक वंजाळ आदीसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा आयोजकातर्फे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी कामगार संघटनेचे अध्यक्ष विनोद बनसोड, कार्याध्यक्ष विलास गुजरमाळे, प्रमोद नवले, विनोद भिंगारे, गणेश गोमकाळे, सजित येवले, विनोद नवले, ज्ञानेश्वर नवले, माधव बोहरूपी, राजेन्द्र ठाकरे, जितेंद्र गोहणे, मयुर जावळे, पिंटु आकोटकर, दीपक ब्राह्मणकर, नरेन्द्र ठाकरे, कैलास गुजरमाळे, अविनाश गुजरमाळे, विकास बागडे, राजु उनपाणे, भूजंग भड, हिरामण गेडाम, रवींद्र काकडे, नितीन नरड, निखिल मेढेकर व रंजना काकडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# खापरखेड्यात क्रांतीसूर्यांना अभिवादन; ‘एक शाम राष्ट्र के अमर दीपकों के नाम’ सोहळा संपन्न

## शेकडो तरुणांनी शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी खापरखेडा येथे 'एक शाम राष्ट्र के अमर दीपकों के नाम' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक भाजप कार्यालयात 'जय तिवारी मित्र परिवार' व युवा शासन ग्रुप' यांच्या संयुक्त वतीने आयोजित या सोहळ्यात शेकडो तरुणांनी क्रांतीकारकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. युवा पिढीमध्ये राष्ट्रप्रेम आणि बलिदानाची ज्योत प्रज्वलित करण्याच्या उद्देशाने हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ नेते किशोर चौधरी होते. त्यांनी क्रांतीकारी त्रिमूर्तींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आजच्या तरुणांनी



क्रांतीकारकांचा देदिप्यमान इतिहास अभ्यासावा आणि देशाच्या प्रगतीसाठी नेहमी कटिबद्ध राहावे. त्यांच्यासोबत उपस्थित असलेल्या भाजपच्या अन्य वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनीही शहीद वीरांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली.

आयोजक जय तिवारी यांनी आपल्या भाषणात तरुणांना प्रेरित केले. आजपासून ९५ वर्षांपूर्वी, ज्या वयात तरुण आपली स्वप्ने विणत असतात, त्या वयात या वीरांनी फाशीच्या दोराला आनंदाने कवटाळले. त्यांचे धैर्य हिमालयापेक्षाही उत्तुंग होते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. भगतसिंगांच्या विचारांचा दाखला देत त्यांनी पुढे सांगितले की, एखाद्या व्यक्तीची हत्या करणे सोपे आहे, मात्र त्याचे विचार कधीच संपवता येत नाहीत. प्रत्येक तरुणाने एक जबाबदार नागरिक म्हणून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहनही तिवारी यांनी यावेळी केले. या सोहळ्याचे सूत्रसंचालन राम डाखरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार तुषार सोनवणे यांनी मानले. या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते रमेश जैन, बळी गायकवाड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सम्यक पौनीकर, सुनील बागडे, आनंद भगत, भूषण पाटील, दद्या पाटील, आयुष उपासे, आदित्य केसकर, आदित्य मेश्राम, शुभम माडवे, सचिन दिसेल, पियुष वाघमारे, नितीन राऊत, यश डोंगरे, अंशू आखरे, लोकेश उपासे व 'समस्त युवा शासन ग्रुप'च्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## दापोली सांस्कृतिक महोत्सव २०२६

### तालुकास्तरीय भजन स्पर्धेत पडले येथील श्री दत्तसेवक भजन मंडळ प्रथम

**अक्षराज : कृष्णा श्रावण पाटील**



**दि.२३, दापोली (रत्नागिरी) :** महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि कै. कृष्णामामा महाजन स्मृतिप्रतिष्ठान यांच्या सहयोगाने आयोजित ‘दापोली सांस्कृतिक महोत्सव २०२६’ अंतर्गत झालेल्या तालुकास्तरीय भजन स्पर्धेत पडले येथील श्री दत्तसेवक भजन मंडळाने प्रथम क्रमांक पटकावून उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेत मंडळातील कलाकारांनी एकापेक्षा एक सुंदर भजन, रूपावली, गजर, अभंग आणि गवळणींचे सादरीकरण करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. मंडळाचे प्रमुख गायक जीवन वसंत गुहागरकर बुवा यांनी प्रभावी शैलीत भजन सादर केले. त्यांना सुदर्शन बुरंबाडकर (पखवाज) आणि प्रथमेश आंजर्लेकर (तबला) यांनी सुरेल साथ दिली.

भजन सादरीकरण दरम्यान जीवन बुवांनी दापोली सांस्कृतिक महोत्सवाचे पार्श्वभूमीवर खास गजर सादर केला. या गजरामुळे परीक्षक, आयोजक तसेच उपस्थित भजन रसिक मंत्रमुग्ध झाले.

गजराचे शब्द –

दापोली सांस्कृतिक महोत्सव हा रंगला... कृष्णामामांच्या पुण्याईने कलेचा जागर झाला.

या यशामुळे पाडले गावासह संपूर्ण परिसरातून श्री दत्त सेवक भजन मंडळाचे कौतुक होत आहे. विशेष म्हणजे प्रबोध लिमये, आणि मित्र परिवार यांनी पाडले भजन मंडळाचे कौतुक केले आहे.

## परभणीत संत कक्कया महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, परभणी (सातारा) :** परभणी येथील कौस्तुभ मंगलकार्यालयात १२ व्या शतकातील लिंगायत साहित्याचे संरक्षणकर्ते आणि महात्मा बसवेश्वरांचे पट्टशिष्य, अनुभव मंडपातील थोर ‘संत श्री कक्कया महाराज’ यांची जयंती परभणी शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कौस्तुभ मंगल कार्यालय येथे आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सेवानिवृत्त तहसीलदार टोपाजीराव फुलपगार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे रितसर उद्घाटन झाले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकरराव फुलवरे होते. व्यासपीठावर कृषी अधिकारी सुनीलजी कदम, ज्येष्ठ नागरिक लक्ष्मणराव नांदुरे आणि सामाजिक कार्यकर्ते देविदास महामुने यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी समाज प्रबोधनकार अनिलजी बसुळे आणि सामाजिक कार्यकर्ते सोनोपंत कावळे यांनी संत कक्कया महाराज यांच्या जीवनावर आणि कार्यावर प्रकाश टाकला. महाराजांनी लिंगायत साहित्याचे जतन करतानाच अनुभव मंडपामध्ये दिलेले योगदान आणि सामाजिक समतेचा विचार आजही तितकाच प्रेरक असल्याचे प्रतिपादन यावेळी वक्त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर नारायणकर यांनी केले. सूत्रसंचालन देवानंद फुलवरे व किरण फुलपगार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विश्वनाथ फुलवरे यांनी मानले. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी खंडेराव खरात, डॉ.सखारामजी काळे, विश्वनाथ महामुने, भगवान नरहिरे, विश्वनाथ इंगोले, चंद्रकांत फुलवरे, दिलीप नारायणकर, बालाजी फुलपगार, राजेश कावळे, शेषराव फुलपगार, दिलीप बोराडे, राजेश खरात, पद्माकर कावळे, रामा फुलपगार आणि कमळाजी कावळे यांसह सर्व समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## नित्कृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामावर मनसेचा आक्रमक पवित्रा; ७ दिवसांत चौकशीची मागणी

**अक्षराज : रविंद्र खाडे**



**दि.२४, शहापूर (ठाणे) :** वेहलोळी ते ढाढरे मार्गावरील रस्त्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे सुरू असल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संबंधित प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. मनसे शहापूर तालुका उपाध्यक्ष दिनेश भास्कर वेखंडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी तक्रार करून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

स्थानिक ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी येऊनही संबंधित ठेकेदाराकडून कामाच्या गुणवत्तेमध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. तसेच या कामावर सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे हे काम अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मनसेच्या वतीने करण्यात आलेल्या निवेदनात, सदर रस्त्याच्या कामाची तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच रस्त्यावर टाकण्यात आलेल्या डांबराचे नमुने घेऊन त्याची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असेही नमूद करण्यात आले आहे. यासोबतच या कामासाठी मंजूर करण्यात आलेले तांत्रिक अंदाजपत्रक (ऍींळारींश) सादर करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. जेणेकरून प्रत्यक्ष काम आणि मंजूर आराखड्यातील फरक स्पष्ट होऊ शकेल. दरम्यान, जर पुढील ७ दिवसांत या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात आली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही दिनेश वेखंडे यांनी दिला आहे.

**स्थानिक नागरिकांमध्ये संताप**

या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे भविष्यात रस्त्याची अवस्था पुन्हा खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून दर्जेदार काम सुनिश्चित करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.